# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३०५२**

**अपिलार्थी श्री. मेर्विन रिचर्ड वेगास**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)**
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
फोर्ट, मुंबई - ४००००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (आर्थिक गुन्हे)**
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
फोर्ट, मुंबई - ४००००१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०७.२०२४ | १६.०८.२०२४ | २६.०८.२०२४ | २५.०९.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.१०.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १६.०८.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २५.०९.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ३१.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(1) Seeking inspection of the file noting Inword Entry No: 2087 22.02.2024 received dated from Commissioner of Police to Jt. CP, EOW from 22.02.2024 till the action of Prosecution Sanction.*
*(2) Give information of the Procedure or Circular as per the Rules in force in Police Commissionerate for Prosecution Sanction against Jt CP, DCP, ACP, Sr PI to be approved bt Hon. Governor of Maharashtra.*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१)(ञ) अन्वये नाकारण्यात येत आहे.

..२/-

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने अपिलार्थींनी दि. २६.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०९.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन अपील अमान्य करुन निकाली काढलेले आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १३.०१.२०२६ आयोगास सादर करुन नमुद केले की, त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या अनुषंगाने अति महत्वाच्या अशा निवडणुक बंदोबस्त करता नियुक्त केलेले आहेत. तरी सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात यावी.

५. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १८.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १६.०१.२०२६**